# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०२४

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

### राज्यात महिलांवरील अत्याचार, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार व हुंडाबळीसारख्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(१) २१४७२ (०५-०१-२०२४) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिलांवरील अत्याचार, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार व हुडांबळीसारख्या गुन्हयांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला असून यामध्ये शाळकरी आणि महाविद्यालयीन विद्यार्थीनीचा मोठ्या प्रमाणात समावेश असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०२४) :** (१) माहे जानेवारी, २०२२ ते सप्टेंबर, २०२२ व जानेवारी, २०२३ ते सप्टेंबर, २०२३ मध्ये राज्यातील महिलांवरील अत्याचार, बलात्काराचे गुन्ह्यांमध्ये वाढ झाली असून कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी या गुन्ह्यांमध्ये घट झाली त्याबाबतचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| महिला अत्याचाराचे गुन्हे | जाने. ते सप्टेंबर,२०२२ | जाने. ते सप्टेंबर,२०२३ |
|---|---|---|
| बलात्कार Women Rape (IPC 376) | २०९२ | २२३५ |
| बालकांचे लैंगिक शोषण Posco Sec.4&6 (IPC 376) | २८४४ | ३२६८ |
| एकूण बलात्कार :- | ४९३६ | ५५०३ |
| कौटुंबिक हिंसाचार (IPC 498A) | ८४८९ | ८२७६ |
| हुडांबळी (IPC 304B) | १२८ | ११३ |
| एकूण गुन्हे :- | १३५५३ | १३८९२ |

(२) राज्यात महिला व बालकांच्या सुरक्षतेसाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहे. महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलिसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी या उपाययोजना करण्यात येत आहेत. राज्यात २० पोक्सो व १२ जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आले आहेत. महिला हेल्पलाईन क्र. १०३, १०९१, ११२ कार्यरत असून त्याद्वारे महिलांना २४*७ मदत देण्यात येते. राज्यात मानवी तस्करीला आळा घालण्याच्या अनुषंगाने ४५ ठिकाणी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. पिडित महिलेला मनौधेर्य योजनेंतर्गत आर्थिक मदत दिली जाते.

महिला अत्याचाराबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास त्याबाबत तांत्रिक तपास करण्यासाठी महाराष्ट्र सायबर कार्यालयात Cyber Crime Prevention against Women & Children (CCPWC) लॅबची स्थापना करण्यात आली आहे. सदर लॅबमध्ये महाराष्ट्रातील अधिकारी व अंमलदारांना प्रशिक्षण देण्यात येते. सन २०१९ पासून महाराष्ट्र सायबर यांनी महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील पोलीसांच्या सहभागाने "सायबर सेफ वुमन" ही मोहिम सुरु केली आहे. त्यामध्ये इंटरनेट वरील फिशींग, वैवाहीक विषयक साईट वरील ओळख चोरी, फोटो मधील फेरबदल, बँका संदार्भातील फसवणूक, पोर्नोग्राफी, सायबर बुलिंग याची माहिती देणारे संकेतस्थळे यांची माहिती या पासून प्रतिबंधात्मक उपाय, सायबर गुन्हा संदर्भातील कायदे तसेच सोशलमिडिया वापरतांना घ्यावयाची काळजी याबाबत प्रत्येक जिल्ह्यात कार्यशाळा राबविण्यात येतात. महाराष्ट्र सायबर कार्यालयात Cyber Crime Prevention against Women & Children (CCPWC) पोर्टल कार्यरत असून त्यावर राज्यभरातील महिला ऑनलाईन तक्रार दाखल करु शकतात. सदर तक्रार दाखल केल्यानंतर महाराष्ट्र सायबरकडून तात्काळ संबंधित जिल्ह्यांना तक्रार पाठविण्यात येते व त्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येतो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दहेगाव-गो (ता.सेलू, जि.वर्धा) येथील महिलेचा प्रेम प्रकरणातून बळी गेल्याबाबत

**(२) २१५७६ (०४-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहेगाव-गो (ता.सेलू, जि.वर्धा) येथील प्रेम प्रकरणातून एका महिलेचा बळी गेल्याची घटना दिनांक ४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी आरोपीना अटक करण्यासंदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-१०-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) आरोपी सोबत असलेले प्रेमसंबंध संपुष्टात आणण्याकरीता महिला टाळाटाळ करीता असल्याने आरोपीने इतर ४ आरोपीसह कट रचून महिलेस चाकूने वार करुन ठार केले.

सदर प्रकरणी पो.स्टे. दहेगाव जि.वर्धा येथे अप.क्र. १४३/२०२३ कलम ३०२, ४५०, १२० (ब), ३४ भादंवि अन्वये ५ आरोपींवर गुन्हा नोंद करण्यात आला असून सर्व आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्याने मा.न्यायालयामध्ये दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) तालुक्यात तंटामुक्त गाव मोहिम प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(३) २२५६० (०५-०१-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शांततेकडून समृद्धीकडे नेणाऱ्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत तालुका प्रशासन, पोलीस प्रशासन, पोलीस पाटील, गावातील सरपंच गावातून निवडण्यात आलेले तंटामुक्त अध्यक्ष यांच्या माध्यमातून गावातील तंटे गावातच सोडवण्याची तरतूद करण्यात आली असून गावातील वाद गावातच मिटत असल्यामुळे ही मोहिम अल्पावधीतच लोकप्रिय ठरली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तंटामुक्त गाव मोहिमेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या वाडा तालुका व खेड्यातील भांडण-तंटे आता पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचत असून तंटामुक्त गाव मोहीमेंतर्गत असलेल्या समित्या निष्प्रभ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तंटामुक्त गाव मोहिमेची योजना प्रत्येक गावामध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी गृह विभागामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

शातंतेकडून समृध्दीकडे नेणाऱ्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजनेंतर्गत तालुका प्रशासन, पोलीस प्रशासन, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पाटील, गावातील सरपंच, गावातुन निवडण्यात आलेले तंटामुक्त अध्यक्ष व इतर सदस्य यांची गाव पातळीवर तंटामुक्त समिती स्थापन करण्यात येते. सदर समिती मार्फत गावातील अदखलप्राप्त स्वरुपाचे तंटे गावपातळीवरच सोडविले जातात. त्यामुळे सदरची योजना अल्पावधीतच लोकप्रिय ठरली आहे.
(२) हे खरे नाही.

महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजनेंतर्गत स्थापन गाव पातळीवरील तंटामुक्त समितीमार्फत गावातील अदखलपात्र व दिवाणी स्वरुपाचे तंटे गावपातळीवरच सोडवले जातात. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव तक्रारदार व विरोधक यांच्यात समझोता होऊ न शकल्यास तक्रारदार हे पोलीस ठाण्यात तक्रार देणेसाठी येतात. परंतु त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे
(३) तंटामुक्त गाव योजनेंतर्गत प्रत्येक गावामध्ये सदरची योजना प्रभावीपणे राबवावी याकरीता गावपातळीवरील समितीमध्ये पोलीस ठाण्याकडील एका पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. पोलीस प्रशासन, बीट अंमलदार यांच्या मार्गदर्शनाखाली तंटामुक्त समिती अध्यक्ष व सदस्य यांची वेळोवेळी बैठक घेवुन योजना प्रभावीपणे राबविण्याकरीता मार्गदर्शक सूचना देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पदवीधर तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(४) २२७४५ (०५-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या ''स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२३' च्या अहवालानुसार देशातील २५ वर्षाखालील ४२ टक्के पदवीधर तरुण बेरोजगार असून यामध्ये महाराष्ट्रातील तरुणांची संख्या देखील लक्षणीय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवालानुसार सर्वाधिक २२.८ टक्के बेरोजगारी दर २५ ते २९ वयोगटातील तरुणांमध्ये आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अहवालाच्या अनुषंगाने राज्यातील पदवीधर तरूणांतील बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (११-१०-२०२४) :** (१), (२) व (३) अझीम प्रेमजी विद्यापीठाचा कोणताही अहवाल शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, राज्यातील तरुण वयोगटातील उमेदवारांना अत्याधुनिक तंत्रज्ञानानुरुप कौशल्य प्रशिक्षणाच्या आधारे रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विषयक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता उक्त विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीची स्थापना करण्यात आली. सदर सोसायटीमार्फत राज्यातील उमेदवारांना विविध क्षेत्रातील अभ्यासक्रमांचे सूचीबध्द प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून अल्पमुदतीचे प्रशिक्षण देवून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच, सोसायटीमार्फत प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना व उपजीविकेसाठी कौशल्य संपादन ज्ञान जागरुकता अभियान (SANKALP) ह्या केंद्र पुरस्कृत योजना आणि प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (प्रमोद महाजन- ग्रामीण कौशल्य केंद्र व आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र) ह्या राज्य शासन पुरस्कृत योजना व किमान कौशल्य विकास केंद्र ही जिल्हा पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे.

सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी नियोक्ते कारखानदार, व्यापारी व सुशिक्षित बेरोजगार यांना संयुक्त व्यासपीठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनामार्फत रोजगार मेळावे आयोजित करण्यात येतात. त्याकरीता नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांची तसेच नियोक्त्यांच्या नोंदणीसाठी विभागामार्फत ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

दिनांक ११/०२/२००४ च्या शासन निर्णयान्वये बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून दिनांक २८/०८/२०२४ च्या शासन निर्णयान्वये बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायट्यांना रुपये १०.०० लक्ष पर्यंतची कामे विना निविदा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता दिनांक ०९/०७/२०२४ च्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना" कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत १८ ते ३५ वर्षे वयोगटातील उमेदवारांना शासकीय/ निमशासकीय/ खाजगी आस्थापनांत ६ महिन्यांसाठी कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याकरीता उमेदवारांसाठी तसेच मनुष्यबळाची आवश्यकता असलेल्या शासकीय/ निमशासकीय/ खाजगी आस्थापनांसाठी विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत इयत्ता बारावी उत्तीर्ण प्रशिक्षणार्थींना प्रतिमाह ₹ ६,०००/-, आय.टी.आय/ पदविका प्राप्त प्रशिक्षणार्थींना प्रतिमाह ₹ ८,०००/- व पदवी/ पदव्युत्तर पदवी प्राप्त प्रशिक्षणार्थींना प्रतिमाह ₹ १०,०००/- इतके विद्यावेतन अनुज्ञेय करण्यात आले आहे. सदर विद्यावेतन प्रशिक्षणार्थींच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा होणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राने एम.ए. शिक्षणशास्त्रच्या प्रथम सत्र परीक्षेचा आणि पुनर्मुल्यांकनांचे निकाल जाहीर केले नसल्याबाबत

**(५) २२९११ (२२-०७-२०२४) श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.राजहंस सिंह, श्री.प्रसाद लाड, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राने एक वर्षांचा कालावधी होवूनही एम.ए. शिक्षणशास्त्रच्या काही विद्यार्थ्यांचा प्रथम सत्र परीक्षेचा निकाल जाहीर केलेला नाही, तसेच विद्यापीठाच्या चौथ्या सत्रातील अभियांत्रिकीच्या सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांचे निकाल व सन २०२१ मध्ये न्यायवैद्यकशास्त्र आणि सायबर कायद्याच्या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेऊन ३ वर्षे होऊनही परिक्षांचा निकाल जाहीर करण्यात आलेला नसल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २८ मार्च, २०२३ ते दिनांक ५ एप्रिल, २०२३ या कालावधीत घेण्यात आलेल्या प्रथम सत्र परीक्षेचा निकाल तब्बल ९ महिन्यांनंतर दिनांक २ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास जाहीर करण्यात आला असून ठाण्यातील महाविद्यालयात परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल अद्यापही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पहिल्या आणि दुसऱ्या सत्रातील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकन निकाल सात ते आठ महिन्यांच्या विलंबाने जाहीर करून त्यांना अनुत्तीर्ण केल्याने विद्यार्थ्यांच्या तिसऱ्या आणि चौथ्या वर्षाचे शैक्षणिक नुकसान झाले असून होतकरु विद्यार्थ्यांना शैक्षणिक व नोकरीच्या संधी गमावल्या आहेत, गतवर्षी ॲडव्हान्स फिलॉसॉफी ऑफ एज्युकेशन या विषयाची ७५ ऐवजी ६० गुणांची प्रश्नपत्रिका देण्यात आली, त्यानंतर विद्यार्थ्यांनी सीडीओईचे तत्कालीन संचालक व अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करूनही विद्यार्थी निकालाच्या प्रतीक्षेत आहेत अशा स्वरूपाच्या तक्रारींमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून विद्यार्थी पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करतात उत्तरपत्रिकांची छायाप्रत पीडीएफ स्वरुपात प्राप्त झाल्यानंतर त्या

छायाप्रतीमधील काही पानेच गहाळ झाले असणे व पुनर्मूल्यांकनाचा निकाल वेळेवर न लागल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या प्रथम सत्र परीक्षेच्या निकाल व चौथ्या सत्रातील अभियांत्रिकीच्या सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांच्या निकालाच्या विलंबास जबाबदार असलेल्या तसेच पुर्नमूल्यांकनाच्या उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग करताना संबंधित कंपनीकडून सातत्याने चुका होत असणे, उत्तरपत्रिकांमधील पाने गहाळ होणे, चुकीच्या छायाप्रती देणे असे प्रकार करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१६-१०-२०२४) :** (१) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठाच्या दुरुस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राची एम. ए. शिक्षणशास्त्र च्या प्रथम सत्राची परीक्षा ही दिनांक २८ मार्च, २०२३ ते ५ एप्रिल, २०२३ या कालावधीत घेण्यात आली असून, सदर परीक्षेचा निकाल हा २ डिसेंबर, २०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

अभियांत्रिकीच्या सत्र ३ ते ६ च्या परीक्षा ह्या महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात येत असून त्या सर्व परीक्षांचे निकाल हे विद्यापीठ परिपत्रक क्रमांक UG/325 of 1991, dated 4th October, 1991 नुसार महाविद्यालयीन स्तरावरच जाहीर करण्यात येतात. सर्व सत्रांचे निकाल हे विहित मुदतीत जाहीर झालेले आहे.

विद्यापीठ परिपत्रक क्रमांक UG/५०/२०२४, दिनांक २७ नोव्हेंबर २०१४ नुसार पदवीपूर्व प्रमाणपत्र व पदविका आणि पदव्युतर प्रमाणपत्र ह्या परीक्षांचे परीक्षा पूर्व व परीक्षोत्तर ही सर्व कामे विद्यापीठाच्यावतीने संबंधित महाविद्यालय करतात व या परीक्षांचे निकालपत्रे संबंधित महाविद्यालयात तयार करून परीक्षा नियंत्रकांच्या मंजुरीसाठी परीक्षा विभागातील निकाल कक्षाकडे पाठवतात. तथापि, सन २०२१ मध्ये न्यायवैदकशास्त्र आणि सायबर कायदा हा पद्व्युत्तर पदविका अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठात संचालित नव्हता, त्यामुळे या अभ्यासक्रमाचा निकाल घोषित करण्याची बाब उद्भवत नाही.
(२) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठाच्या दुरुस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राची एम.ए. शिक्षणशास्त्रच्या प्रथम सत्राच्या परीक्षेचा निकाल हा २ डिसेंबर, २०२३ रोजी जाहीर करण्यात आला असून ठाण्यातील महाविद्यालयात एकूण २० विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र देण्यात आले होते. त्यापैकी १० विद्यार्थी परीक्षेस अनुपस्थित होते. परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी ८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून २ विद्यार्थी अनुतीर्ण झाले आहेत.
(३) व (४) एप्रिल व मे, २०२४ मध्ये घेतलेल्या पहिल्या व दुसऱ्या सत्रातील अभियांत्रिकी परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर पुनर्मूल्यांकनासाठी प्राप्त अर्जानुसार सर्व विद्यार्थ्याचे निकाल विहित कालावधीत जाहीर करण्यात आलेले आहेत. निकाल सात ते आठ महिने विलंबाने जाहीर करुन विद्यार्थ्यांना अनुतीर्ण करून त्यांच्या तिसऱ्या व चौथ्या वर्षाच्या प्रवेशाचे नुकसान झाले तसेच होतकरू विद्यार्थ्यांना त्यांच्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या अशा प्रकारची कुठलीही तक्रार विद्यापीठाकडे प्राप्त झालेली नाही.

काही महाविद्यालयांनी ॲडव्हान्स फिलॉसॉफी ऑफ एज्युकेशन या विषयाची ७५ ऐवजी ६० गुणाची प्रश्नपत्रिका डाऊनलोड केली असली तरी, सदर उत्तरपुस्तिका तपासून दिनांक २ डिसेंबर, २०२३ रोजी विद्यार्थ्यांचा निकाल विद्यापीठाने जाहीर केलेला आहे.

उत्तरपुस्तिकेची फोटोकॉपी गहाळ झाल्याबाबत (विद्यार्थ्यांना अपूर्ण स्वरूपात उत्तरपुस्तिकेची फोटोकॉपी प्राप्त) ३० विद्यार्थ्यांकडून परीक्षा विभागास तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता सदर बाब उत्तर पुस्तिकेच्या फोटोकॉपीची एकत्रित पीडीएफ फाईल तयार करताना घडून आली असल्याचे निदर्शनास आले. तथापि, सदर तांत्रिक बाबीत सुधारणा करून विद्यार्थ्यांना पूर्ण स्वरूपातील उत्तरपुस्तिकेची फोटोकॉपी तातडीने उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

याबाबत अधिक दक्षता घेण्याच्या अनुषंगाने उत्तरपुस्तिकेची फोटोकॉपी पुरवण्याची सेवा देणाऱ्या कंपनीस विद्यापीठाकडून समज देण्यात आली असून, यापुढे अशी तांत्रिक चूक घडणार नाही याबाबत खबरदारी घेण्याचे सूचित करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मा.उच्च न्यायालयाच्या विस्तारित संकुलासाठी वांद्रे येथे जमीन देण्याबाबत

**(६) २२९२६ (२२-०७-२०२४) श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालयाच्या फोर्ट, मुंबई येथील इमारतीची अवस्था बिकट असल्याने न्यायाधीश व कर्मचारी वर्गाच्या जीवितेस धोका निर्माण झाला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या विस्तारित संकुलासाठी वांद्रे येथे जमीन देण्याबाबत सहा महिन्यांमध्ये अंतिम निर्णय घ्यावा, असे स्पष्ट आदेश मा.उच्च न्यायालयाने माहे नोव्हेंबर, २०२३ वा त्यादरम्यान शासनाने आदेश देऊनही यासंदर्भात कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे. चौकशीच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या विस्तारित संकुलासाठी वांद्रे येथे जमीन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.रविंद्र चव्हाण (०५-०९-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर भूखंड हस्तांतरीत करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केलेली कार्यवाही व भूखंड रिक्त करण्याबाबत करण्यात आलेल्या नियोजनाबाबत शपथपत्र मा.उच्च न्यायालयात दिनांक १०/०४/२०२४ रोजी दाखल करण्यात आले आहे. त्यानुषंगाने शासकीय निवासस्थाने इमारतींमधील

रहिवासी कर्मचाऱ्यांना इतर इमारतीध्ये स्थलांतरीत करुन व अस्तित्वात असलेली इतर बांधकामे देखील निष्कासित करुन दिनांक ०५/०९/२०२४ पर्यंत प्रथम टप्प्यात ४.३९ एकर व मार्च-२०२६ पर्यंत टप्प्या टप्प्याने उर्वरित संपूर्ण भूखंड रिक्त करण्याबाबतचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाळुंज ते शेंद्रा (जि.छत्रपती संभाजीनगर) दरम्यानच्या उड्डाणपुलाचे बांधकाम करणेबाबत

**(७) २३०३९ (२२-०७-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळुंज ते शेंद्रा (जिल्हा छत्रपती संभाजीनगर) येथील २८ कि.मी.चा मेट्रोसह, उड्डाणपुल बांधकाम करणेबाबत केंद्रीय मंत्री, मार्ग परिवहन व महामार्ग नौकानयन यांनी घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगरसह वाळुंज व शेंद्रा या औद्योगिक वसाहतीचा झपाट्याने विस्तार होत असून भविष्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सोडविण्यासाठी वाळुंज ते शेंद्रा २८ कि.मी.अंतराचा उड्डाणपुल करणे आवश्यक असून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या सुचनेनुसार महामेट्रोने मेट्रोसाठी ४६०० कोटी व उड्डाणपुलासाठी ३८०० कोटीचा डीपीआर तयार केला परंतु निधी अभावी सदर डीपीआर रद्द केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाळुंज ते शेंद्रा दरम्यान उड्डाणपुल करणेसाठी माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी सुचवल्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने उड्डाण पुलाच्या बांधकामासाठी ३८०० कोटींचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०४-१०-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) वाळुंज ते शेंद्रा या उड्डाणपुलाच्या कामाचा रुपये ३७३७.०७ कोटी रकमेचा डीपीआर स्मार्ट सिटी प्राधिकरण (छत्रपती संभाजी नगर) यांनी तयार करुन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना माहे मार्च २०२३ मध्ये सादर केला होता. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी माहे मे, २०२३ मध्ये स्मार्ट सिटी प्राधिकरण यांना कळविले आहे की सदर रस्ता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांच्या अखत्यारीत नसून छत्रपती संभाजी नगर शहराला यापूर्वीच बायपास विकसित केला आहे व सदर प्रस्ताव भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI)/ MoRTH च्या योजनेमध्ये मंजूर नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळा तसेच खाजगी आदिवासी अनुदानित आश्रमशाळेतील अपुऱ्या सुविधांमुळे वेळापत्रकात बदल करण्याच्या मागणीबाबत

**(८) २३०४७ (१८-०७-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक ५ जुलै, २०२३ रोजी पत्र निर्गमित करून आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळा तसेच खाजगी अनुदानित आदिवासी आश्रमशाळांचे वेळापत्रक बदलले असून सदर वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांची दिनचर्या सकाळी ५.३० ते रात्री ९.३० पर्यंत निश्चित करण्यात आली असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी आश्रमशाळांमध्ये सरासरी ३०० ते ४०० विद्यार्थी निवास करत असून तेथे मूलभूत सुविधांचा असलेला अभाव व अपुऱ्या स्वच्छतागृहांमुळे त्यांना सकाळी ५.३० ते ६.१५ हा कालावधीत विद्यार्थ्यांना स्नान, नाश्ता व अन्य विधीकरीता पुरत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्ग एक ते चार चे विद्यार्थी सकाळी साडेसातला नाश्ता घेतल्यानंतर बारा वाजेपर्यंत भोजनाकरीता प्रतीक्षा करू शकत नाहीत, तसेच सकाळी आठ पंचेचाळीस पासून तासिका सुरू होत असल्यामुळे शिक्षकांना ज्यादा तासिका घ्यायला वेळ मिळत नसल्याने व आदिवासी आश्रमशाळांमध्ये ५० ते १०० अनिवासी विद्यार्थी असल्यामुळे ते पावणे नऊ पर्यंत शाळेत पोहोचू शकत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने आदिवासी आश्रमशाळांचे वेळापत्रक बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित (१७-१०-२०२४) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

दिनांक ०५ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासकीय व अनुदानित आश्रमशाळांचे वेळापत्रक बदलण्यात आले आहे. मात्र वेळापत्रक बदल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) नवीन वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांना सकाळी ५.३० ते ६.१५ हा वेळ प्रार्तविधीसाठी, सकाळी ७ ते ७.४५ हा वेळ वैयक्तिक स्वच्छतेसाठी ठेवण्यात आला असून सकाळी ७.४५ ते ८.३० हा वेळ नाश्तासाठी ठेवण्यात आलेला आहे. तसेच शाळेच्या पूर्व तयारीसाठी ८.३० ते ८.४५ हा वेळ ठेवण्यात आलेला आहे. सदर वेळ पुरेसा आहे.

(३) विभागांतर्गत आश्रमशाळा या निवासी असून बहुतांश विद्यार्थी निवासी आहेत. सुधारित वेळापत्रकामुळे विद्यार्थ्यांना ठराविक अंतराने नास्ता व जेवण मिळते. तसेच १५ मिनीटाच्या २ लहान सुट्या व १ तासाची १ मोठी सुट्टी ठेवण्यात आलेली आहे. सुधारित वेळापत्रकामुळे विद्यार्थ्यांच्या दैनदिन कार्यक्रमात सुसुत्रता आली असून त्यांना मैदानी खेळ व स्वयंअध्ययनासाठी पुरेसा वेळ मिळत आहे. आश्रमशाळेतील बहिस्थ: विद्यार्थी जवळपासच्या अंतरातील असल्याने त्यांना शाळेत पोहचण्यास उशिर होत असल्याची व त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) व (५) सुधारित वेळापत्रकामुळे आश्रमशाळांमधील वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या दैनदिन कार्यक्रमात सुसुत्रता आली असून याबाबत विद्यार्थी अथवा पालकांकडून कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. सद्य:स्थितीत या वेळापत्रकात बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील महाविद्यालये समूह विद्यापीठ संकल्पनेस प्रतिसाद देत नसल्याबाबत

**(९) २३१०० (२२-०७-२०२४) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नव्या शैक्षणिक धोरणात समूह विद्यापीठाची संकल्पना मांडून जास्तीत जास्त महाविद्यालयांनी त्याकडे वळावे यासाठी केंद्र शासन व राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणात प्रयत्न होत असले तरी या योजनेला कोल्हापूर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील महाविद्यालयांनी प्रतिसाद दिला नसल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील महाविद्यालयांनी समूह विद्यापीठ प्रतिसाद दिला नसल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, नव्या शैक्षणिक धोरणात समूह विद्यापीठाची संकल्पना कार्यान्वित होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०९-१०-२०२४) :** (१) हे खरे नाही.

राज्यामध्ये समूह विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकिर्ण-२०२३/प्र.क्र.११२/विशि-३ दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ अन्वये शासनाने मार्गदर्शक तत्वे निश्चित केलेली आहे. तसेच, शासन निर्णय दिनांक १० जानेवारी, २०२४ अन्वये समूह विद्यापीठ स्थापन करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी/ व्यवस्थापनानी शासनाकडे अर्ज करण्याच्या कार्यपध्दतीबाबत व तपशीलवार प्रकल्प अहवाल निश्चित करण्याबाबतच्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

कोल्हापूर येथील श्री.वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणानगर ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर या संस्थेचा वारणा विद्यापीठ, वारणानगर जि.कोल्हापूर हा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला असून सदर विद्यापीठाच्या प्रस्तावास मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २५/०८/२०२४ च्या बैठकीत मंजूरी मिळाली आहे.

याशिवाय, शासनाकडे मालाड कांदिवली एज्युकेशन सोसायटी, मालाड मुंबई यासंस्थेचा प्रस्ताव प्राप्त झाला असून छाननी समितीने दिलेल्या अहवालानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच, नागपूर येथील शासकीय विज्ञान संस्थेचा, वर्धा येथील शिक्षा मंडळ वर्धा या संस्थेचा आणि महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी पुणे या संस्थेचा असे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावांची छाननी समितीकडून तपासणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्वयंअर्थसहाय्यीत शाळांची आर.टी.ई. प्रतिपुर्ती देण्याबाबत

**(१०) २३३१९ (२२-०७-२०२४) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वयंअर्थसहाय्यीत शाळांच्या आर.टी.ई. प्रतिपुर्तीकरीता मंजूर केलेल्या २०० कोटी रुपयांपैकी ८४ कोटी रुपये दिले असून उर्वरीत ११६ कोटी रुपये अद्याप मिळाले नसल्याने इंग्रजी शाळा कर्जबाजारी होत असल्यामुळे संस्था चालकाना आर्थिक अडचणीना सामोरे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व आर.टी.ई. प्रतिपुर्ती शाळेना पी.एफ.एम.एस. प्रणाली द्वारेच प्रतिपुर्ती देण्यात यावी याची अंमलबजावणी त्वरीत करून कोरोना काळात इंग्रजी माध्यमातील शाळांनी ऑनलाईन शिक्षण दिलेले असून यात सचिव स्तरावर ८,०००/- रुपये प्रमाणे प्रतिपुर्तीचा दर ठरवण्याचा आदेश देण्यात आले असून सदर आदेश रद्द करण्याबाबत तसेच महाराष्ट्रातील टि.सी. विना शिक्षण हा शासन निर्णय इंग्रजी शाळेना लागू करण्यात येऊ नये जेणेकरून काही पालक वर्षभर फी भरण्यास टाळाटाळ करतात व पुढील वर्षी दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्वयंअर्थसहाय्यीत शाळांची प्रलंबित असलेली आरटीई फी परतावा देण्याबाबत तसेच शाळाबाह्य विद्यार्थ्यासाठी वेगळी नोंदणी करुन टि.सी. विना प्रवेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१७-१०-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात आरटीई अंतर्गत शैक्षणिक खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी रुपये २०० कोटी व रुपये ४६.४९ कोटी ची पुरवणी मागणी असे एकूण रुपये २४६.४९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(२) सन २०२२-२३ पासून प्रती विद्यार्थी शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीचा दर रुपये १७,६७०/- असा पुर्ववत करण्यात आलेला आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील कलम ५[२] व [३] नुसार विद्यार्थ्यास एका शाळेतून दुसऱ्या शाळेत प्रवेश द्यावयाचा हक्क आहे. त्यामुळे स्वयंअर्थसहाय्यीत शाळांना ही सवलत देता येणार नाही.

(३) शाळाबाह्य बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील कलम चार नुसार वयानुरूप प्रवेश देण्याची कार्यवाही नियमित रित्या करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे पुसद (जि.यवतमाळ) येथे जलजीवन मिशन योजनेतंर्गत झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(११) २३४३१ (२०-०७-२०२४) श्री.निलय नाईक :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) येथे जलजीवन मिशन अंतर्गत सन २०२२-२०२३ मध्ये वा त्यादरम्यान कामे मंजूर झाली असून सदर कामांकरीता निविदाप्रक्रियेद्वारे ठेकेदाराची निवड करण्यात येऊनही अद्याप कामे अपूर्ण असून सदर कामामध्ये भ्रष्टाचार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदर कामे जलदगतीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्याची, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२७-०७-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. पुसद तालुक्यातील (जि.यवतमाळ) येथे जलजीवन मिशन अंतर्गत ११३ नळ पाणीपुरवठा कामे मंजूर असून, सदर कामापैकी ११ कामे पूर्ण झालेली असून, उर्वरित कामे प्रगतीपथावर आहे. सदर कामांची देयके ही कंत्राटदारामार्फत करण्यात आलेल्या कामांची मोजमापे नोंदवुन अदा करण्यात येत असल्यामुळे भ्रष्टाचार झालेला नाही.
(२) सदर कामे जलद गतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित कंत्राटदारांची वेळोवेळी आढावा सभा घेवून, त्यांना समज दिली आहे. ज्या कामांची गती संथ आहे. अशा कामांच्या कंत्राटदारांना रुपये ५० ते रुपये २०० प्रतिदिन दंड आकारणी करून कामाची गती वाढविण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## राज्यात वरिष्ठ महाविद्यालयांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) २३४४४ (२२-०७-२०२४) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाविद्यालयांना नॅक मूल्यांकनामध्ये चांगला दर्जा प्राप्त व्हावा, यासाठी शासन प्रयत्नशील असून मुलांना मिळणारे शिक्षण उच्च दर्जाचे असावे असा शासनाचा प्रयत्न आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संचालक, उच्च शिक्षण यांनी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण आणि संबंधित महाविद्यालये/ संस्थाचे प्राचार्य यांना महाविद्यालयाचे नॅक करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना वेळोवेळी दिल्या असूनही राज्यातील ३३४६ पैकी १९५२ महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण केली नसून काही महाविद्यालयांनी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रारंभ दिनांकापर्यंत नॅक मुल्यांकनाबाबतची प्रक्रीया सुरु केलेली नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बहुतांशी महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक संवर्गातील एकूण रिक्त पदांपैकी ४० टक्के पदे (३५८० पदे) भरण्यास मान्यता देण्यात आली होती. या पदांपैकी रिक्त असलेल्या २०८८ पदांची भरती करण्यास दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासननिर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नॅक मुल्यांकन करुन घेण्यासाठी पात्र असलेल्या महाविद्यालयांना शासनाकडून वेळोवेळी सूचना देऊनही नॅक मुल्यांकन न

केलेल्या महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली, तसेच ३५८० रिक्त पदांपैकी २०८८ पदे भरण्यास मान्यता देण्यात आली असून उर्वरित पदे भरण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१६-१०-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) संचालक, उच्च शिक्षण यांनी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण आणि संबंधित महाविद्यालये/ संस्थाचे प्राचार्य यांना महाविद्यालयाचे नॅक करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना वेळोवेळी दिल्या आहेत. मे २०२४ अखेर एकूण ३३४६ महाविद्यालयांपैकी १६११ महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकनाची कार्यवाही पूर्ण केली आहे. नॅक मुल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्याबाबत विद्यापीठांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

दिनांक ०३/११/२०१८ नुसार पदभरतीसाठी ३५८० पदे अनुज्ञेय होती त्यापैकी १४९२ पदे भरण्यात आलेली होती. उर्वरित २०८८ पदे भरण्यासाठी शासन निर्णय दिनांक १२/११/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली होती. २०८८ पदांपैकी १३२३ पदे भरण्यात आली आहेत. दिनांक २४/०७/२०२३ च्या शासन निर्णयान्वये रिक्त पदांपैकी ४५१ पदे स्वायत्त महाविद्यालयांना भरण्यासाठी अनुज्ञेय करण्यात आली असून त्यापैकी ५९ पदे स्वायत्त महाविद्यालयांकडून भरण्यात आलेली आहेत. सद्य:स्थितीत ३५८० पदांपैकी २८७४ पदे भरण्यात आलेली आहेत. उर्वरीत पदे भरण्याची प्रक्रीया विहित कार्यपध्दतीनुसार सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेसाठी विलंब होत असल्याबाबत

**(१३) २३५७३ (२२-०७-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तसेच रिध्दपूर (जि.अमरावती) येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासनाने घोषणा केली असून सदर मराठी भाषा विद्यापीठाबाबतच्या समितीचा अहवाल माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाला प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यात हे विद्यापीठ सुरू करण्यासंदर्भात जागा निश्चित करण्याचे धोरण शासनाने ठरविले असून अंदाजे किती कालावधीत मराठी भाषा विद्यापीठ सुरू करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, मराठी भाषा विद्यापीठ सुरु करण्यासाठी मराठी भाषा विद्यापीठ अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने विद्यापीठ सुरु करण्याबाबत माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१५-१०-२०२४) :** (१) समितीचा अहवाल नोव्हेंबर, २०२३ मध्ये प्राप्त झाला आहे.
(२) व (३) मराठी भाषा विद्यापीठ, रिध्दपूर, जि.अमरावती येथे स्थापन करण्यात आले असून दिनांक १५ फेब्रुवारी, २०२४ पासून मराठी भाषा विद्यापीठ अधिनियम अंमलात आला आहे. सदर अधिनियमातील तरतुदींनुसार विद्यापीठ सुरू करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू व प्रथम कुलसचिव यांची नियुक्ती दिनांक ३ सप्टेंबर, २०२४ च्या आदेशान्वये करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईत महाराष्ट्र भवनाची उभारणी करण्याबाबत

**(१४) २३५९४ (२२-०७-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सिडको संचालक मंडळाच्या एकूण ८३२२.९१ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा भूखंड महाराष्ट्र भवन तथा विश्रामगृहाच्या बांधकाम व व्यवस्थापनाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग करण्यात येत असल्याचा निर्णय घेतल्याबाबत माहे मार्च,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंडाचे सविस्तर सर्वेक्षण करुन मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांच्यामार्फत सदर भूखंडाचे सविस्तर सर्वेक्षण करुन मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांच्यामार्फत महाराष्ट्र भवनाकरीता रेखांकन आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र भवनाकरीता रेखांकन आराखडे तयार करण्याचे काम पूर्ण करुन सदर इमारत बांधण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (२३-१०-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नगरविकास विभाग यांच्या दिनांक ०४/०७/२०२४ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार दिनांक ०१/०६/२०२३ रोजी सहयाद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकी दरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर काम सिडकोमार्फत हाती घेण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील महावितरण उपविभागीय कार्यालयातील आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१५) २३६०६ (२२-०७-२०२४) श्री.गोपीचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील महावितरण उपविभागीय कार्यालयात होत असलेले आर्थिक नुकसान निदर्शनास आल्यामुळे या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांच्या गैरकारभाराची चौकशी निवृत्त मा.न्यायधिशामार्फत करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०२४) :** (१) हे अंशतः खरे आहे. माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींनी माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे केलेले लेखी निवेदन हे महावितरण कार्यालयास एप्रिल २०२४ दरम्यान प्राप्त झाले आहे.
(२) उपरोक्त पत्रात नमूद कायमस्वरुपी विजपुरवठा खंडीत ग्राहकांच्या अनियमिततेप्रकरणी यापूर्वीच सिंदखेड राजा उपविभाग जिल्हा बुलढाणा येथील संबंधित दोषी जबाबदार असलेल्या कर्मचारी/ अधिकारी यांच्यावर वेळोवेळी शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. सन २०२२ मध्ये कायमस्वरुपी विजपुरवठा खंडीत अनियमिततेबाबत एकूण ५ कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली व त्यामधील २ कर्मचाऱ्यांवर निलंबनासारखी कारवाई करण्यात आली होती. तसेच २०२१ मध्ये २ कर्मचाऱ्यांवर कारणे दाखवा नोटीस बजावून कारवाई करण्यात आली. सन २०२३ मध्ये सुरक्षा व अंमलबजावणी विभागातर्फे केलेल्या P.D. ग्राहकांच्या तपासणी मोहिमेअंतर्गत कसूरदार आढळलेल्या सिंदखेड राजा येथील ३ कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंग कारवाई करण्यात आलेली आहे. बिलिंगच्या कामातील अनिर्यामततेबाबतची चौकशी महावितरणच्या विविध कार्यालयाकडून तसेच Vigilance (सुरक्षा व अंमलबजावणी) विभागाकडुन करण्यात आलेल्या आहेत. जेव्हा अशा प्रकारच्या अनियमितता महावितरणच्या निदर्शनास येतात. तेव्हा महावितरणकडून सखोल चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर ताबडतोब कारवाई केली जाते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील रुग्णालयांतील परिचारिका, प्राचार्य इ. आवश्यक पदांची भरती करण्याबाबत

**(१६) २४०४६ (०८-०८-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात परिचारिका संवर्गातील सर्व स्तरावरील शुश्रूषा, शैक्षणिक व प्रशासकीय विभागातील तसेच प्राचार्याची पदे सेवा जेष्ठतेनुसार भरण्यासंदर्भात विभागास कार्यवाही करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान दिले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण विभागाने या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-१०-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) परिचर्या संवर्गात अधिक्षीका, शुश्रुषा सेवा हे गट-अ चे एकाकी पद असून सदर पद पदोन्नतीने भरण्यात आलेले आहे. परिचर्या महाविद्यालयातील अधिव्याख्याताची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परीक्षा घेतली असून पात्र उमेदवारांची शिफारस झाल्यानंतर सदर पदे भरण्यात येतील. परिचर्या संवर्गातील अधिपरिचारिकांची सरळसेवेची ३९७४ पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून ती पूर्ण होताच गट-क पदावरील पदोन्नतीबाबतची कार्यवाही आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांच्या स्तरावर लवकरात लवकर करण्यात येईल. प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, पाठ्यनिर्देशिका इत्यादि पदांचे सेवाप्रवेश नियम मंजूर करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे, परिचर्या संवर्गातील पदांचे सेवाप्रवेश नियम सन १९६४ मधील असून सदर सेवाप्रवेश नियमामध्ये काळानुरुप बदल करण्याची आवश्यकता असून त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील मामा तलाव पुनर्जिवीत करण्याबाबत

**(१७) २४२८३ (२२-०७-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भामध्ये विशेषत: भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये ७०० पेक्षा अधिक माजी मालगुजारी तलाव असून या मालगुजारी तलावामुळे त्या भागातील सिंचन क्षमता १.३४ हजार हेक्टर इतकी आहे सद्य:स्थितीत पूर्व विदर्भातील सर्व प्रकारच्या मालगुजरी तलावांची अथवा मामा तलावांची स्थिती दयनीय असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९५० नंतर जमिनदारी पध्दत बंद झाल्यामुळे मालगुजारी तलाव शासनाच्या अखत्यारीत आले असून सन २००८ मध्ये राज्य शासनाने भूजल समिती तयार करुन या तलावांना पुनर्जिवीत करण्यासाठी उपाययोजना करण्याचे ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पूर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलाव पुनर्जिवित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (२६-०९-२०२४) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यात एकूण ६०३१ माजी मालगुजारी तलाव असून त्यापैकी २२१६ माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे पुढील ३ वर्षात करण्याचे नियोजित असून त्यापैकी एकूण १०१५ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पूर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीकरीता शासन निर्णय दिनांक १६ मे, २०१६ व ११ ऑक्टोबर, २०२३ अन्वये माजी मालगुजारी तलाव पुनरुज्जीवन व बळकटीकरण कार्यक्रम राबवित आहे. त्यानुषंगाने गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यात एकूण ६०३१ माजी मालगुजारी तलाव

असून त्यापैकी २२१६ माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे पुढील ३ वर्षात करण्याचे नियोजित असून त्यापैकी एकूण १०१५ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आरटीई प्रवेशाबाबत शासनाच्या वारंवार बदलत असलेल्या धोरणामुळे पालक, संस्थाचालक व विद्यार्थी यांच्यात असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्याबाबत

**(१८) २४२९९ (२२-०७-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण हक्क कायद्यातील राखीव आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या २५ टक्के जागांवरील प्रवेश प्रक्रियेतून खाजगी विनाअनुदानित शाळा वगळण्याचा निर्णय शासनाने दिनांक ९ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या परिपत्रकाद्वारे जाहीर केला असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ९ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या परिपत्रकाला स्थगिती देऊन नवीन सुधारित परिपत्रक काढून २५% प्रवेशाचा नियम पुन्हा पूर्ववत लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदर नवीन परिपत्रकानुसार पुन्हा प्रवेश प्रक्रिया राबवण्याची आवश्यकता भासणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ७६ हजार ५३ शाळांमध्ये ८ लाख ८६ हजार ४११ जागांची नोंदणी सदर प्रक्रियेसाठी झाली असून त्यासाठी ६९ हजार ३६१ अर्ज प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या वारंवार बदलत असलेल्या धोरणामुळे पालक, संस्थाचालक, विद्यार्थी यांच्यात संभ्रमाचे वातावरण असून याप्रकरणी शासनाबाबत असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील प्रक्रिया सुरळीत राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१७-१०-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. १४८८७/२०२४ मधील दिनांक १९/०७/२०२४ रोजीच्या आदेशान्वये दिनांक ०९/०२/२०२४ रोजीची अधिसूचना रद्द ठरविण्यात आल्याने यापुर्वी प्रचलित असलेल्या नियमानुसार प्रवेशप्रक्रिया पुन्हा राबविण्यात येऊन बालकांच्या प्रवेशाची कार्यवाही करण्यात आली आहे.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात आरटीई २५ टक्के अंतर्गत नोंदणीकृत ९,२१७ शाळांमधील १,०५,२४२ प्रवेशाकरीता उपलब्ध असणाऱ्या जागांसाठी २,४२,५१६ अर्ज प्राप्त झाले आहेत. आतापर्यंत ६१,१९५ इतके प्रवेश निश्चित झाले असून प्रतिक्षा यादीतील बालकांना प्रवेश देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## त्र्यंबकेश्वर व इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील दुर्गम वाड्या वस्त्यांवर मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) २४३१५ (०८-०८-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील देवगाव परिसरातील लचकेवाडी, डोंगरवाडी, तोरणवाडी, गणेश नगर तसेच इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील खैरेवाडी या गावांमध्ये रस्ते व इतर मूलभूत सोयी सुविधा अद्यापही उपलब्ध नसल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गावांमध्ये रस्ते, वीज व पाणी या मूलभूत सोयी सुविधा तातडीने पुरविण्याची मागणी एल्गार सामाजिक संघटनेने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे दिनांक ३ मे, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली असून येथील नागरीकांनी लोकसभा निवडणुकीतील मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील दुर्गम वाड्या वस्त्यांवर तात्काळ मूलभूत सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२८-१०-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर वाड्यांकरीता पाणी पुरवठ्याच्या सुविधेकरीता ग्रामपंचायतीमार्फत व पेसा (अबंध निधी) मधुन पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच, खैरेवाडी ग्रा.पं. चिंचलेखैरे, ता.इगतपुरी येथील वाड्यावस्त्यांवर जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतीत आहे.

देवगाव परिसरातील लचकेवाडी, डोंगरवाडी, तोरणवाडी, गणेशनगर या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता उपलब्ध असून खैरेवाडी हे गाव चिंचलखैरे ग्रामपंचायत अंतर्गत वाडी असून सदर ठिकाणी चिंचलखैरे पासून खैरेवाडी पर्यंत ३.०० कि.मी. चा पाऊलवाट रस्ता अस्तित्वात असून सदरचा रस्ता हा अवर्गीकृत ग्रामिण मार्ग आहे. तो वनविभागाच्या हद्दीत असल्याने वन विभागाकडून जागा हस्तांतरीत होणे आवश्यक आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही शक्य आहे.

(२) हे खरे आहे,

तथापि, संबंधित वाड्यावस्त्यांना पाणीपुरवठा योजना तात्काळ पूर्ण करणेबाबत तसेच, पर्यायी उद्भवाद्वारे पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असल्याने ग्रामस्थांनी मतदानावरील बहिष्कार मागे घेतला होता.

(३) सदर वाड्यावस्त्यांकरीता पाणीपुरवठा सुविधा करणेकरीता १५ व्या वित्त आयोग व पेसा (अबंध निधी) मधुन पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून खैरेवाडी ग्रा.पं., चिंचलेखैरे, ता.इगतपुरी येथील जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर नळ पाणीपुरवठा योजनेचे काम तात्काळ पूर्ण करुन लवकर पाणीपुरवठा सुरु करण्यात येणार आहे.

तसेच, चिंचले ते खैरेवाडी ते धारगांव जोडरस्ता अवर्गीकृत ग्रामीण मार्ग, ता.इगतपुरी सुधारणा करणे या कामाचा प्रस्ताव आदिवासी उपयोजना बिरसा मुंडा जोडरस्ते अंतर्गत संबंधित विभागाकडे सादर झाला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घाटदरे (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील पारगांव खंडाळा ते घाटदरे रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(२०) २४३६७ (१२-०८-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटदरे (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील पारगांव खंडाळा ते घाटदरे या रस्त्याची दूरवस्था झाली असून सदर रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य नागरीकांना व वयोवृद्धांना त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मार्च, एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२४-०९-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रामा-१५ ते भोळी बावडा खंडाळा भोसलेवाडी पाडळी कोपडे ते रामा- ११७ रस्ता प्रजिमा-११६ कि.मी. ८/६०० ते १६/९०० मध्ये सुधारणा करणे (भाग :- प्रजिमा-३ ते बोरी) या कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक १५/०३/२०२४ अन्वये प्रदान केले आहे. सद्य:स्थितीत रस्त्याचे काम प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.